दैनिक

# मातृतीर्थ टाइम्स

जिल्ह्याचा मानबिंदू

मराठी

RNI NO.MHMAR/25/A3696

मुख्य संपादक : संतोष नारायण पऱ्हाड मो. ८६२४८२१९७६ कार्यकारी संपादक : अनंता रुस्तुमराव झोरे मो. ८६९८४८६२६३

• बुलढाणा • वर्ष १ ले • अंक ४२ वा • सोमवार, १६ मार्च २०२६ • किंमत २ रुपये • एकूण पृष्ठे : ४ • website -https://www.matrutirthtimes.com

# चिखलीकरांनो सावध व्हा ! ब्रेड खाताय की विष ? ब्रेड बनवताना घातक पदार्थांचा वापर ?



**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

चिखली: शहरात विक्री होणाऱ्या काही ब्रेडमध्ये घातक रासायनिक पदार्थांचा वापर होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. पोटॅशियम ब्रोमेट, पोटॅशियम आयोडेट यांसारख्या रसायनांचा वापर केल्याने कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी माहिती समोर आली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने पोटॅशियम ब्रोमेटचा वापर करण्यास बंदी घातली असतानाही काही ठिकाणी नियम धाब्यावर बसवून ब्रेड तयार केला जात असल्याचे सांगितले जात आहे. हे रसायन पीठ फुगवण्यासाठी व ब्रेड अधिक मऊ व आकर्षक दिसण्यासाठी वापरले जाते. मात्र त्याचा दीर्घकालीन परिणाम आरोग्यावर गंभीर होऊ शकतो.

विशेष म्हणजे शहरातील काही बेकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ब्रेडचे उत्पादन केले जाते. काही ठिकाणी बनवलेला ब्रेड शहरातील दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी पाठवला जातो. त्यामुळे नागरिकांनी ब्रेड खरेदी करताना काळजी घेण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, अशा रसायनांचा सातत्याने सेवन केल्यास पोटाचे विकार, कॅन्सरचा धोका तसेच इतर आजार होण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मेहुणा राजा येथे 'महाराजस्व समाधान शिबिरा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद; ६९ दाखल्यांचे जागेवरच वाटप

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

दे. मही: शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेला थेट मिळावा आणि प्रलंबित कामे मार्गी लागावीत्त, या उद्देशाने राबवण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'ला मेहुणा राजा महसूल मंडळात मोठा प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये विविध विभागांतील ६९ दाखले आणि प्रमाणपत्रांचे लाभार्थ्यांना जागेवरच वाटप करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी या शिबिराला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. राजस्व मंडळ मेहुणा राजा अंतर्गत येणाऱ्या १४ गावांमधील शेतकरी,

सरपंच, पोलीस पाटील आणि ग्रामस्थांनी या शिबिरासाठी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार श्रीमती डोंगरजाळ होत्या. यावेळो नायब तहसीलदार सायली जाधव, भूमी अभिलेखचे उपाध्यक्ष खेडेकर, सहाय्यक गटविकास

अधिकारी वायळ, सीडीपीओ मुंढे, महसूल मंडळाधिकारी विजय हिरवे आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रशासकीय कामांसोबतच सामाजिक प्रबोधन केवळ शासकीय कामांपुरते मर्यादित न राहता, या शिबिरात सामाजिक विषयांवरही प्रकाश

टाकण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'व्यसनमुक्ती' आणि 'संत चोखा मेळा चरित्र दर्शन' या विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. महसूल मंडळाधिकारी विजय





हिरवे

यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या आयोजनाची भूमिका मांडली, तर तहसीलदार डोंगरजाळ यांनी अध्यक्षीय भाषणातून शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांचा हेतू स्पष्ट केला. आरोग्य तपासणी आणि तक्रार निवारण शिबिराच्या निमित्ताने आरोग्य विभागातर्फे

शेतकरी बांधवांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये प्रामुख्याने मधुमेह तपासणी करण्यात आली. तसेच, शेतरस्त्यांच्या कामाचाबत ७ नवीन अर्ज प्राप्त झाले असून त्यावर लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनातर्फे देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी विविध विभागांच्या स्टॉल्सना भेट देऊन मार्गदर्शन केले,


कार्यक्रमाचे संचालन शरद काकडे यांनी केले, तर आभार ग्राम महसूल अधिकारी हांडे यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी संजय हांडे, तांबे, पी. डी. बुरकुल, मुख्याध्यापक जायभाये, म्हस्के सर आणि महसूल कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




# चिखली शहरातील जयस्तंभ चौक परिसरात रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास अग्नीतांडव

## चिखलीतील आगीत सहा दुकाने जळाली





**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

चिखली : शहरातील जयस्तंभ चौक परिसरात रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास अग्नीतांडव घडले. लागलेल्या आगीत सहा ते सात दुकाने जळून मोठी हानी झाली.

भेळ सेंटर, फळांच्या दुकानांसह एक घड्याळ दुरुस्तीचे दुकान, कृषी केंद्र आणि इतर काही लहान व्यावसायिकांची दुकाने आगीत जळून खाक झाली. दुकानांना लागूनच मोठा बाजार परिसर असल्याने एकच धावपळ उडाली.

अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. दुकाने जळून खाक झाल्याने व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार श्वेता महाले, नगराध्यक्ष पंडितराव देशमुख, कुणाल बोंद्रे, काशिनाथ बोंद्रे, सलिम मेमन, गोपाल देव्हढे, सुरेंद्र ठाकूर, सुहास शेटे, राम बनसोडे, उमेदअली खान, मुख्याधिकारी प्रशांत बिडकर यांच्यासह सामाजिक व राजकीय क्षेत्रातील लोकांनी घटनास्थळी धाव घेतली.

यांची जळाली दुकाने

आगीत दीपक बोंद्रे, प्रद्युम्न श्याम भिमेवाल, जयंतीभाई सुतारीया, बाळू हांडगे, राजू राजपूत यांची दुकाने जळून खाक झाली.

## गोठ्यातून 16 क्विंटल तूर चोरीला!

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

मलकापूर : तालुक्यातील अनुराबाद शिवारात एका शेतकऱ्याच्या गोठ्यातून अज्ञात चोरट्यांनी ७३ हजार ६०० रुपये किमतीची १६ क्विंटल तूर लंपास केल्याची घटना १३ मार्च रोजी उघडकीस आली. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मयुर राजेंद्र नारखेडे (वय २१, रा. अनुराबाद) या तरुण शेतकऱ्याने शेतातील तुरीची मळणी करून पीक घरात आणले होते. त्यांनी अंदाजे ४० क्विंटल तूर युरियाच्या ८० गोण्यांमध्ये भरून गावाशेजारील त्यांच्या मालकीच्या वाड्यातील पत्र्याच्या खोलीत ठेवली होती.

दरम्यान, १२ मार्च रोजी सायंकाळी ६:३० ते १३ मार्च रोजी सकाळी ७:०० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी ताड्याच्या मागील बाजूने लोखंडी पत्रे वाकवून आत प्रवेश केला व त्यातील १६ क्विंटल तूर चोरून नेली. याप्रकरणी मयुर नारखेडे यांच्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ व ३३४ (१) अन्वये गुन्हा दाखल



करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक दीपक राठोड करीत आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांच्या शेतातील साहित्य व शेतमाल चोरीला जाण्याच्या घटना

# आई-वडिलांसह आजी-आजोबांचे नाव शोधून बीएलओंकडे द्या : उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांचे आवाहन

## बीएलओंकडून प्रत्यक्ष मतदारांची पडताळणी

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

बुलढाणा : केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम प्रस्तावित आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून मतदारांचे मॅपिंगची प्रक्रिया केली जात आहे. या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष मतदारांची पडताळणी करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) घरोघरी जावून भेट देत आहेत. पडताळणीसाठी स्वतःचे किंवा आई-वडील, आजी-आजोबा यांचे नाव शोधून बीएलओंकडे द्यावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शरद पाटील यांनी केले आहे.




प्रत्येक मतदारास सन २००२ च्या मतदार यादीतील आपले किंवा आपले वडील/आई/आजोबा/आजी यांच्या नावाची आवश्यकता भासणार आहे. तसेच दोन पासपोर्ट आकाराचे अद्ययावत रंगीत छायाचित्र व आयोगाने निर्धारित केलेल्या १३ कागदपत्रांपैकी जन्म तारखेनुसार कागदपत्राची आवश्यकता भासणार आहे. सद्यस्थितीत पूर्व तयारी म्हणून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) २९ ऑक्टोबर २०२४ च्या मतदार यादीचे सन २००२ च्या मतदार यादीसोबत मॅपिंगचे काम करीत आहेत.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे मोबाइलद्वारे प्रत्यक्ष संपर्क साधून मतदारांकडून सन २००२ च्या यादीबाबत माहिती गोळा करीत आहेत. तसेच मतदार यादीतील फोटो/नाव/वय/लिंग या बाबत दुरुस्तीसाठी मतदारांशी संपर्क करीत आहे.

२२-बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहकार्य करावे. सन २००२ च्या मतदार यादीतील आपले किवां आपले वडील /आई/आजोबा/आजी यांची नावे शोधण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या http://ceoelectiol.maharashtra.gov.in/ या वेब साइटवरील "एसआयआर" २००२ या टॅबवर किंवा भारत निवडणूक आयोगाच्या httph://voters.eci.gov.in/searchinSIR या वेबसाइटवर जाऊन सर्च युवर नेम इन लास्ट "एस आय आर" या टॅबवर लिंक करून शोधता येईल. मतदारांनी आपले किंवा आपले वडील /आई/आजोबा/आजी यांचे सन २००२ च्या मतदार यादीतील आपले नाव शोधून ते आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडे देण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शरद पाटील यांनी केले आहे. मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम प्रस्तावित आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून मतदारांचे मॅपिंगची प्रक्रिया केली जात आहे. या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष मतदारांची पडताळणी करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) घरोघरी जावून भेट देत आहेत.

---

## ज्येष्ठ सर्पमित्राचा साप चावल्याने मृत्यू

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

मलकापूर : पकडत असताना विषारी सापाने चावा घेतल्याने मलकापूर येथील एका ज्येष्ठ सर्पमित्राचा दुर्दैवी मृत्यू झाला. १३ मार्चला मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. तीन दिवसांपूर्वीच खामगाव तालुक्यातही एका सर्पमित्राचा सापाने दंश केल्याने मृत्यू झाला.



नामदेव विश्वनाथ उज्जैनकार (रा. यशोधाम कॉलनी, मलकापूर) असे मृत सर्पमित्राचे नाव आहे. गाडेगाव परिसरातील पवनसुत नगरातील काही नागरिकांनी रात्रीच्या सुमारास सर्प निघाल्याची माहिती सर्पमित्र नामदेव उज्जैनकार यांना दिली. तातडीने दाखल होऊन दोन फूट खोल नालीमध्ये दडून बसलेल्या सापाला त्यांनी पकडले. मात्र साप झटका देऊन चिमट्यातून सटकला आणि उज्जैनकार यांच्या उजव्या पायाच्या पंजावर दंश केला. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले. मात्र, काही वेळानंतर सर्पमित्र उज्जैनकर यांनी जगाचा निरोप घेतला. आतापर्यंत अनेक सापांना त्यांनी जीवदान दिले. तर अनेक नागरिकांचा विषारी सापांना पकडून जीव वाचविला. त्यांच्या मृत्यूने मलकापूर परिसरात शोक व्यक्त केला जात आहे

---

## सरोवराच्या वाढत्या पाण्यावरून आमदार खरात यांचा विधिमंडळात संताप





**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

लोणार : जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर असलेल्या लोणार सरोवराच्या वाढत्या जलपातळीचा विषय मेहकरचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधिमंडळ सभागृहात मांडला. प्रशासकीय उदासीनतेमुळे सरोवराचे अस्तित्व धोक्यात आल्याचे सांगत वन विभागाच्या आडमुठ्या धोरणावरही खरातांनी टीका केली. वेळीच सरोवर वाचविण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी केली.

सरोवराची पाणी पातळी सातत्याने वाढत असल्याने परिसरातील प्राचीन मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. वाढती जलपातळी हा सरोवराच्या दृष्टीने घातक प्रश्न बनला आहे, असे सांगत आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे आणि वन विभागाच्या परवानग्या रखडल्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे नुकसान होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधत सरकारच्या धोरणावर नाराजी व्यक्त केली.

पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नियुक्त समितीने एकदाही सरोवराची पाहणी केली नसल्याबद्दलही खरात यांनी रोष व्यक्त केला.

### ४१ लाखांचा निधी मंजूर; काम मात्र ठप्प

सरोवरातील वाढीव पाणी उपसा करण्यासाठी आणि धारतीर्थातील गोमुखाचे पाणी वळवण्यासाठी ४१ लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. मात्र, वन्यजीव विभाग आणि पुरातत्व विभाग यांच्यात समन्वय नसल्याने कामाला सुरुवात झाली नाही. वन्यजीव विभाग दाद देत नाही आणि लोकप्रतिनिधींना जुमानत नाही, अशा शब्दांत आ. खरात यांनी संताप व्यक्त केला.

विकास आराखड्यात सुविधांचा अभाव

लोणार शहराच्या विकास आराखड्यावर बोलताना खरात म्हणाले, पर्यटकांच्या सोयीसाठी शहरात उद्यान, पॅराग्लायडिंग, तारांगण, मोठा टेलिस्कोप, रोपवे आणि चांगले रस्ते यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. या आराखड्यात तत्काळ सुधारणा करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

लोणार विकासासाठी मंजूर ४३४ कोटींपैकी १७४ कोटींचा निधी प्राप्त झाला असून, त्यातील १८० कोटी रुपये सरोवरासाठी खर्च केले जाणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

---

## देऊळगाव राजा: समाज मंदिर जागेवरील अतिक्रमण प्रकरणी उपोषण यशस्वी; पालिकेकडून बांधकाम परवाना रद्द

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

देऊळगाव राजा: शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील समाज मंदिराच्या जागेवर झालेल्या कथित अतिक्रमणाविरोधात सुरू असलेले बेमुदत उपोषण अखेर यशस्वी झाले आहे. नगरपालिकेने संबंधित जागेचा बांधकाम परवाना रद्द करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी आपले उपोषण मागे घेतले आहे.

बातमीचा सविस्तर तपशील: बौद्ध समाजाच्या मालकीच्या जागेवर एका विशिष्ट वृत्तीकडून १९८६ पासून अतिक्रमण करण्यात आले होते आणि त्या ठिकाणी अनधिकृतरीत्या बांधकाम परवाना मिळवला होता, असा आरोप आंदोलकांनी केला होता. या अन्यायाविरोधात आकाश कासारे, यश कासारे, विजय कासारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह सुमारे १४ ते १५ जणांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते. प्रशासनाचा निर्णय आणि मध्यस्थी: या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी डॉ. रामप्रसाद शेळके यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या उपस्थितीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी (सीईओ) यांनी आंदोलनस्थळी भेट दिली.

गाावातील प्रतिष्ठित नागरिक आणि ज्येष्ठ नेत्यांच्या समक्ष मुख्याधिकाऱ्यांनी सदर जागेचा बांधकाम परवाना आज संध्याकाळपर्यंत रद्द करण्याचे लेखी आश्वासन दिले. तसेच, या जागेला कंपाउंड करण्यात येईल असेही स्पष्ट करण्यात आले. समतेचा विजय: "हे आंदोलन कोणत्याही जाती-धर्माच्या विरोधात नसून केवळ चुकीच्या प्रवृत्तीविरोधात होते. आज प्रशासनाने परवाना रद्द केल्यामुळे खऱ्या अर्थाने बौद्ध जनतेचा विजय झाला आहे," अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली. देऊळगाव राजा हे शाहू-फुले-आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे गाव असून येथे सर्व धर्मीय शांततेने राहतात, असेही यावेळी नमूद करण्यात आले. या निर्णयामुळे आंबेडकर नगर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

---

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर आता सरपंचांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती; प्रशासकीय हालचालींना वेग

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

खामगाव: जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतींची पाच वर्षांची मुदत संपली आहे, अशा ठिकाणी आता नवीन निवडणुका होईपर्यंत सरपंचांचीच 'प्रशासक' म्हणून नियुक्ती करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली आहे. या निर्णयामुळे रखडलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराला पुन्हा गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश खामगाव तालुक्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या संदर्भात गटविकास अधिकाऱ्यांनी (BDO) संबंधित ग्रामपंचायतींना अधिकृत पत्र पाठवले आहे. या पत्राद्वारे प्रशासक नियुक्तीसह प्रशासकीय समिती गठित करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. अनेक ग्रामपंचायतींना ही पत्रे प्राप्त झाली असून, काही ठिकाणी प्रत्यक्ष नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर उर्वरित ठिकाणी ती अंतिम टप्प्यात आहे. का घेतला हा निर्णय? सुरुवातीला, मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून 'ग्रामविस्तार अधिकाऱ्यांची' नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, एकाच अधिकाऱ्याकडे अनेक ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार आणि अधिकाऱ्यांची अपुरी संख्या यामुळे प्रशासकीय कामात मोठे अडथळे निर्माण होत होते. ही अडचण लक्षात घेऊन आता सरपंचांनाच प्रशासक म्हणून जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणुका रखडल्याने पेच विविध कारणांमुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. निवडणुका होत नसल्याने गावगाडा चालवण्यासाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणेची गरज होती. आता प्रशासकीय समिती आणि सरपंच प्रशासक म्हणून काम पाहणार असल्याने गावातील विकासकामे आणि दैनंदिन प्रश्न सुटण्यास मदत होईल.

मातृतीर्थ टाइम्स मराठी हे पत्र मालक,प्रकाशक संतोष नारायण पऱ्हाड यांनी मुद्रक गायत्री ट्रेडर्स, वार्ड क्रमांक ६ मेन रोड चिखली ,बुलढाणा , महाराष्ट्र 44 32 06 येथून मुद्रित करून कार्यालय सिविल कॉलनी देऊळगाव राजा येथून प्रकाशित केले. संपादक संतोष नारायण पऱ्हाड 8624821976. प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही) सर्व वाद विवाद देऊळगाव राजा न्यायालया अंतर्गत. RNI NO. MHMAR/25/A3696
Matrutirth times marathi , This newspaper is printed by the owner, publisher, Santosh Narayan Parhad, printer Gayatri Traders, printing place Ward no. 6 ,Main Road Chikhali.Dist. Buldhna 443206(M.S.) and published from -Office: Matrutirth Times Marathi Office Deulgaon Raja Dist. Buldana (M.H). Editor: Santosh Narayan Parhad 8624821976. The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act.) All disputes will be subject to Deulgaon Raja Court.) RNI No. MHMAR/25/A3696

मिळालेल्या माहितीनुसार,

# तुटलेल्या वीज तारेने तोडली आयुष्याची तार; पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा शेतात वीजवाहिनीच्या तुटलेल्या वीजप्रवाहित तारेचा शॉक लागून मृत्यू

मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी

**देऊळगाव राजा : पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा शेतात वीजवाहिनीच्या तुटलेल्या वीजप्रवाहित तारेचा शॉक लागून मृत्यू झाला. रविवार, १५ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास देऊळगाव राजा तालुक्यातील आळंद फाटा शिवारात ही घटना घडली.**

**अश्रूबा ज्ञानबा घुले (वय ५५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. लोणार तालुक्यातील खापरखेडा येथील रहिवासी असलेले घुले हे मागील काही वर्षांपासून आळंद येथे आपल्या नातेवाइकांकडे राहत होते. त्यांनी आळंद परिसरातील शेती बटईने घेतली होती. १५ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास ते पिकाला पाणी देण्यासाठी गेले होते. शेतातून गेलेल्या वीज वाहिनीच्या तुटून पडलेल्या तारेला स्पर्श झाल्याने जोराचा करंट लागून अश्रूबा यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूस महावितरण जबाबदार असल्याचा आरोप करीत नातेवाइकांसह गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला.**



# हिवरा आश्रम येथे शिक्षणासाठी जाणारी २० वर्षीय तरुणी बेपत्ता;

## डोणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी

डोणगाव (प्रतिनिधी):पांगरखेड येथील एक २० वर्षीय तरुणी हिवरा आश्रम येथे शिक्षणासाठी जात असल्याचे सांगून घरून निघाली, मात्र ती परतलीच नाही. याप्रकरणी तरुणीच्या वडिलांनी डोणगाव पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, बेपत्ता तरुणी २७ फेब्रुवारी रोजी सकाळी पांगरखेड येथील आपल्या घरातून "हिवरा आश्रम येथे शिक्षणासाठी जाते" असे सांगून निघाली होती. मात्र, त्यानंतर ती घरी परतली नाही. बराच वेळ झाला तरी मुलगी न आल्याने कुटुंबीयांनी तिची शोधाशोध सुरु केली.

मोबाईल बंद आणि वसतिगृहातून धक्कादायक माहिती

तरुणीशी संपर्क साधण्यासाठी तिच्या मोबाईलवर वारंवार फोन केला असता, तिने फोन उचलला नाही आणि काही वेळाने तिचा फोन बंद (Switch Off) झाला. त्यानंतर कुटुंबीयांनी ती ज्या वसतिगृहात (Hostel) राहते, तिथे चौकशी केली. तेव्हा धक्कादायक माहिती समोर आली की, सदर तरुणीने 'आजारी असल्याचे' कारण सांगून रजेचा अर्ज दिला होता आणि ती १४ फेब्रुवारीपासूनच वसतिगृहात गैरहजर होती. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# चार दिवस वादळी पाऊस, गारपिटीचा अंदाज : हवामान खात्याची माहिती राज्यावर आस्मानी संकट कोसळण्याची शक्यता


मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी

बुलढाणा : राज्यातील काही भागांमध्ये १७ ते २० मार्चदरम्यान मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये हा कहर शेतकऱ्यासंह जनतेला सोसावा लागणार आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्चदरम्यान आस्मानी संकट अधिक तीव्रतेने येण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता असल्याने शेतकऱ्यांना मोठे नुकसान होणार आहे.

शेतकऱ्यांनी दक्ष राहण्याचे आवाहन

रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत. हवामानाच्या अंदाजावर लक्ष ठेवून शेतीची कामे नियोजित करावीत आणि संभाव्य पाऊस व वादळी वाऱ्यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.








# लोणारमध्ये कंत्राटदारांची मोठी फसवणूक उघड; बनावट शिक्क्यांद्वारे लाखोंचा घोटाळा, ५ आरोपी अटकेत

मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी

लोणार | १६ मार्च २०२६ : शासकीय कंत्राटदारांची फसवणूक करून बनावट शिक्के आणि खोट्या सह्यांद्वारे सरकारी योजनांचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार लोणार येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ५ आरोपींना अटक केली असून लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणार पंचायत समिती अंतर्गत शासकीय कंत्राटदार म्हणून कार्यरत असलेल्या सौ. गायत्री तुषार ईवरे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. आरोपींनी बनावट शिक्के तयार करून खोट्या सह्या करून शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलीस निरीक्षक प्रकाश सदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय इंगळे व पोलीस शिपाई दीपक पाटील यांनी आरोपींना अटक केली. या प्रकरणात आरोपी शेख मोहसीन शेख जाकीर, महेंद्र सिद्धार्थ भालेराव, सुरेश ज्ञानबा नागरे, संतोष प्रकाश गायकवाड आणि ओम सुधाकर खोडके यांना ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला




# मानोरा तालुक्यात "मेरी पॉलिसी मेरे हाथ" उपक्रम; पिक विमा व पशुधन विम्याबाबत मार्गदर्शन

मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी

मानोरा (वाशिम) : १६ मार्च २०२६

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम 2025 साठी "मेरी पॉलिसी मेरे हाथ" या उपक्रमाचे मानोरा तालुक्यात विविध ठिकाणी आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पिक विमा योजनेबाबत सविस्तर माहिती देण्यात येत असून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहत आहेत.

या कार्यक्रमांतर्गत शेतकरी सभांचे आयोजन करून शेतकऱ्यांना पिक विम्याचे महत्त्व, विमा प्रक्रियेची माहिती आणि योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

यावेळी भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रतिनिधी योगेश आरू यांनी 'फसल बीमा पाठशाला' घेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेची सविस्तर माहिती दिली. तसेच QR चॅटबॉट कोड, कृषी रक्षक पोर्टल याबाबत माहिती देऊन शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे निराकरण करण्यात आले.

यासोबतच दुधाळ जनावरांचे विमा संरक्षण याबाबतही माहिती देण्यात आली. 'संपूर्ण पशुधन कवच' योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी आपल्या दुधाळ जनावरांचे विमा संरक्षण करून घ्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना विमा योजनांची माहिती थेट मिळत असून पिक विमा आणि पशुधन विमा याबाबत जागरूकता वाढत असल्याचे चित्र मानोरा तालुक्यात पाहायला मिळत आहे.



# देऊळगाव मही येथे तरुणाला लाकडी काठीने बेदम मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

देऊळगावराजा : तालुक्यातील देऊळगाव मही येथे एका तरुणाला बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना शनिवारी मध्यरात्री घडली आहे. एका बारसमोर झालेल्या या वादात तिघांनी मिळून तरुणाला लाकडी काठीने मारून जखमी केले. या प्रकरणी पीडित तरुणाच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, कैलास प्रल्हाद देढे (वय ३४, रा. देऊळगावमही) हे १३ मार्च रोजी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास देऊळगाव मही येथील एका बारसमोरून जात होते. यावेळी आरोपींनी त्यांना अडवून जमिनीवर पाडले आणि लाकडी काठीने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. या हल्ल्यात कैलास देढे हे गंभीर जखमी झाले आहेत.

यांच्याविरुद्धझालागुन्हादाखल

जखमी कैलास देढे यांनी दिलेल्या तक्रारीवरून देऊळगाव मही पोलिसांनी खालील तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे:

१. गोविंद देढे
२. कार्तिक लिंबाजी देढे
३. संदीप देढे
(सर्व राहणार: देऊळगावमही)

पोलीस कारवाई आणि तपास

मारहाणीच्या घटनेनंतर जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र पोलिसांकडे सादर करण्यात आले आहे. या तक्रार आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी मारहाण करून दुखापत करणे आणि सामूहिकरीत्या हल्ला करणे या कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया पोलीस हेडकॉन्स्टेबल विनोद गवई यांनी पूर्ण केली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कलीम देशमुख करत आहेत.



# उच्च न्यायालयातील भरतीसाठी पात्र उमेदवारांची यादी जाहीर

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

देऊळगावराजा : पात्र/अपात्र उमेदवारांची यादी: १३ मार्च २०२६ रोजी लिपिक (Clerk), शिपाई/हमाल (Peon/Hamal), लघुलेखक (Stenographer) आणि वाहनचालक (Driver) या पदांसाठी पात्र आणि अपात्र उमेदवारांची तात्पुरती यादी (Provisionally Eligible/Rejected List) अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

परीक्षेचे वेळापत्रक: लेखी परीक्षेची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु ती लवकरच प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. उमेदवारांनी वेळोवेळी अधिकृत वेबसाईट तपासत राहणे आवश्यक आहे.

तांत्रिक पदे: सिस्टीम ऑफिसर (System Officer) आणि सिनियर सिस्टीम ऑफिसर (Senior System Officer) या ८३ कंत्राटी पदांसाठीची अर्ज प्रक्रिया जानेवारी २०२६ मध्ये पूर्ण झाली आहे. पदांचा तपशील (एकूण २३८१ जागा) पद रिक्त जागा |-| लिपिक (Clerk) | १३८२ | शिपाई/हमाल (Peon/Hamal) | ८८७ | वाहनचालक (Staff Car Driver) | ३७ | लघुलेखक (Stenographer L/H Grade) | ७५ | पुढील प्रक्रिया

१. स्क्रीनिंग टेस्ट (Screening Test): पात्र उमेदवारांसाठी सर्वप्रथम लेखी किंवा चाळणी परीक्षा घेतली जाईल.
२. कौशल्य चाचणी (Skill Test): लिपिक पदासाठी टायपिंग टेस्ट आणि लघुलेखकांसाठी शॉर्टहँड टेस्ट घेतली जाईल.
३. मुलाखत: लिपिक आणि काही विशिष्ट पदांसाठी मुलाखत प्रक्रिया पार पडेल.
४. कागदपत्र पडताळणी: अंतिम निवडीपूर्वी सर्व मूळ कागदपत्रांची तपासणी केली जाईल.

टीप: तुम्ही तुमचे नाव पात्र उमेदवारांच्या यादीत आहे का, हे पाहण्यासाठी बॉम्बे हायकोर्टाच्या अधिकृत वेबसाईटला bombayhighcourt.nic.in भेट द्या.




# देऊळगाव राजा: भरधाव अज्ञात वाहनाच्या धडकेत महावितरणच्या कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू; जालना रोड बायपासवरील घटना

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

देऊळगावराजा : शहरातील जालना रोड बायपास परिसरात गुरुवारी रात्री एका भीषण अपघाताची घटना घडली. भरधाव वेगाने आलेल्या एका अज्ञात पांढऱ्या रंगाच्या वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात महावितरणचे कंत्राटी कर्मचारी निकेत सुरेश मिनासे (वय ४२) यांचा गंभीर जखमी होऊन दुर्दैवी मृत्यू झाला.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, निकेत मिनासे हे महावितरणमध्ये कंत्राटी तत्त्वावर कार्यरत होते. १२ मार्च रोजी रात्री ८:३० वाजेच्या सुमारास ते आपल्या दुचाकीने जालना रोडवरून देऊळगाव राजा शहराच्या दिशेने येत होते. दरम्यान, बायपासवरील एका वाईन बारजवळ परिसरात मागून येणाऱ्या एका अज्ञात पांढऱ्या रंगाच्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मिनासे यांच्या डोक्याला आणि शरीराच्या डाव्या बाजूला गंभीर दुखापत झाली.

अपघातानंतर चालक फरार

अपघात घडल्यानंतर संबंधित अज्ञात वाहन चालक घटनास्थळावरून वाहन घेऊन फरार झाला आहे. जखमी मिनासे यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र जखमा अत्यंत गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

पोलीस तपास सुरू

याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आता फरार चालकाचा आणि त्या पांढऱ्या रंगाच्या वाहनाचा शोध घेत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून तपास चक्रांना वेग देण्यात आला आहे. मिनासे यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मुक्त शिक्षण प्रणालीमुळे शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी मिळण्यास मदत –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

मुंबई, – राज्यातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही राज्य शासनाची भूमिका आहे. 'एज्युकेट गर्ल्स'सारख्या अनुभवी संस्थेच्या सहकार्यामुळे राज्य मुक्त शाळा प्रणाली अधिक बळकट होईल आणि शिक्षण अर्धवट राहिलेल्या विशेषतः मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील मुक्त शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि औपचारिक शिक्षण प्रणालीमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना लवचिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकाराने शालेय शिक्षण विभागाने 'एज्युकेट गर्ल्स' संस्थेशी नुकताच सामंजस्य करार केला आहे.

राज्यात प्रत्येकाला शालेय शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायम आग्रही आहेत. यादृष्टीने शालेय शिक्षण विभागामार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थांना देखील नोंदणी करणे बंधनकारक करण्यात येत आहे. पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शिक्षणापर्यंत विद्यार्थी संख्या कायम राहावी यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि कोणत्याही कारणास्तव शालाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहेत. मुख्यमंत्र्यांनी या बाबीला प्राधान्य दिले असल्याने विशेषत: शिक्षणापासून दूर राहिलेल्या मुली, महिला यांना या कराराचा विशेष लाभ होणार आहे. 'एज्युकेट गर्ल्स' ही आशियातील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणाऱ्या रमण मॅगसेसे पुरस्काराने गौरविण्यात आलेली संस्था असून मुलींच्या शिक्षणासाठी प्रभावी कार्य करणाऱ्या अग्रगण्य स्वयंसेवी संस्थांपैकी एक आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीमुळे या संस्थेसमवेत झालेल्या या करारामुळे राज्यातील मुक्त शिक्षण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. या भागीदारी अंतर्गत महाराष्ट्र राज्य मुक्त शाळा मंडळाला सहाय्य करण्यासाठी 'टेक्निकल असिस्टन्स युनिट' स्थापन करण्यात येणार आहे. या माध्यमातून जनजागृती मोहिमा राबविणे, वंचित समुदायांपर्यंत पोहोचणे, तसेच दहावी व बारावीचे शिक्षण पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांची ओळख पटवून त्यांना पुन्हा शिक्षणात सामावून घेण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यास मदत केली जाणार आहे. या उपक्रमात विशेषतः मुली, महिला विद्यार्थी तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यावर भर दिला जाणार आहे.. याशिवाय विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, शिष्यवृत्ती, शुल्क सवलती तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रमांशी जोडण्याच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे.

# डॉ पंढरी इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पळसखेड सपकाळ येथे भव्य आयुर्वेदिक रोगनिदान शिबिर; ३४५ रुग्णांनी घेतला मोफत उपचारांचा लाभ.



**मातृतीर्थ टाइम्स | प्रतिनिधी**

पळसखेड सपकाळ : श्री गुरुदेव आश्रम, पळसखेड सपकाळ यांच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त १५ मार्च २०२६ रोजी भव्य आयुर्वेदिक रोगनिदान व उपचार शिबिर उत्साहात पार पडले. गंगाई हॉस्पिटल व गंगाई बहुउद्देशीय संस्था, चिखली यांच्या वतीने आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. दिवसभर चाललेल्या शिबिरात एकूण ३४५ रुग्णांनी तपासणी करून मोफत आयुर्वेदिक उपचारांचा लाभ घेतला.

या शिबिरात सांधेदुखी, गुडघेदुखी, कंबरदुखी, मणक्याचे विकार, ए.व्ही.एन., सायटिका, पक्षाघात, फ्रोजन शोल्डर, स्पॉन्डिलायटिस, हात-पाय सुन्न होणे व स्नायू वेदना अशा विविध आजारांवर तज्ञांकडून तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. रुग्णांच्या प्रकृतीनुसार स्नेहन, हॉट कॅपिंग, न्युरो-पंचकर्म, विद्धकर्म तसेच अग्निकर्म यांसारख्या आयुर्वेदिक उपचार पद्धतींचा वापर करण्यात आला. त्यामुळे अनेक रुग्णांना तत्काळ आराम मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

शिबिरात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आयुर्वेद वाचस्पती, न्युरो-पंचकर्म व वातविकार तज्ञ डॉ. पंढरी उत्तमराव इंगळे यांनी स्वतः उपस्थित राहून रुग्णांची तपासणी केली व मोफत उपचारासह सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या रुग्णसेवेचे आश्रमातील स्वामीजी यांनी विशेष कौतुक करत आशीर्वाद दिले. समाजहितासाठी अशी आरोग्यसेवा सातत्याने सुरू राहावी, अशा शुभेच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गंगाई हॉस्पिटल व गंगाई बहुउद्देशीय संस्था, चिखली यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. गुरुदेव आश्रमाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत तपासणी, उपचार व आरोग्य मार्गदर्शनाचा मोठा लाभ झाला.